RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No MH/MR/South-339/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-ब

वर्ष ३, अंक १०४] मंगळवार, डिसेंबर २७, २०११/पौष ६, शके १९३३ [पृष्ठे ८
किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १८१

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ डिसेंबर २०११

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र. १९६(१)/म-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्रमांक पीएसआय. १७०७ (सीआर ५०)/उद्योग-८, दिनांक ३० नोव्हेंबर २०११ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ मध्ये सुधारणा करून सदर योजनेला दिनांक ३१ जानेवारी २०१२ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

त्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या पोट-कलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन आदेश क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र. ९६(१)/म-१, दिनांक १२ जून २००७ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ च्या अंतर्गत (यामुळे त्याचा निर्देश उक्त आदेश करण्यात आला आहे) दिलेल्या मुद्रांक शुल्काच्या सवलतीची मुदत दिनांक १ डिसेंबर २०११ ते दिनांक ३१ जानेवारी २०१२ या कालावधीपर्यंत वाढवीत आहे. त्याकरिता उक्त आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—